# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

डॉ. एस. एम. रोकडे
संचालक (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२ फॅक्स : ०७१३२.२२३३२२
Email : bcud.gondwanauniversity@ gmail.com
web : gondwana.digitaluniversity.ac
web:www.unigug.org


क्रमांक/गो.वि./ 340 /२०१५

दिनांक : 9 / 9 /२०१५

urgent

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत संस्था/महाविद्यालये.

**विषय :– तालुक्यातील एकमेव विद्याशाखा अनुदानावर आणण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

**संदर्भ:–** १. मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उ.शि. पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०१५/ताएकमेव/जाहिरात/मवि–२/८६०३, दि. ३१ ऑगस्ट २०१५.

उपरोक्त संदर्भांकिंत विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार तालुक्यातील एकमेव अनुदानीत विद्याशाखा/महाविद्यालयांतर्गत उर्वरित तालुक्यांसाठी संबधित विद्याशाखा अनुदानावर आणण्यासाठी संचालनालयाद्वारे वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

करिता ज्या संस्था/महाविद्यालयांना जाहिरातीमध्ये नमुद तालुक्यातील एकमेव विद्याशाखांना अनुदान मिळण्यासाठी अर्ज करायचे असतील त्यांनी संचालनालयाचे संकेतस्थळावरील अर्जाचे नमुन्यात अर्ज भरून **दि. २२ सप्टेंबर २०१५ पर्यंत** विद्यापीठाकडे सादर करावे. प्रस्तावासोबत अर्जासाठी रू. १०,०००/– शुल्काचा धनाकर्ष **वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचे नावाने असलेला जोडावा. दि. २२/०९/२०१५ नंतर विद्यापीठाकडे प्राप्त होणाऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे.

**सहपत्र:–** संदर्भ पत्र.

संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

प्रारुप जाहिरात.

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

## वाणिज्य व विज्ञान शाखेस (किमान एक) प्रत्येक तालुक्यात अनुदान मंजूरीबाबत

प्रत्येक तालुक्यात किमान एक महाविद्यालय/विद्याशाखा (कला, विज्ञान, वाणिज्य) अनुदानावर आणण्याचे शासनाने ठरविले आहे. तरी शासन पत्र क्र.अनुदान-२०११/(२००/११)/पुनर्बांधणी-६/मशि४, दि.२५ ऑगस्ट, २०१५ अन्वये तलासरी (विज्ञान), देऊळगांवराजा (विज्ञान), तिवसा (विज्ञान), हिंगणा (विज्ञान), बाभुळगांव (विज्ञान) व जिवती (विज्ञान) हे तालुके वगळता इतर सर्व तालुक्यांसाठी तसेच मेहकर तालुक्यासाठी नव्याने जाहिरात देण्यात यावी असे कळविले आहे.

तरी खाली नमूद केलेल्या तालुक्यासमोर दर्शविण्यात आलेल्या विद्याशाखेंसाठी संबंधित विद्यापीठामार्फत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**प्रपत्र-अ**

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हा | तालुका | विद्याशाखा संख्या | विद्याशाखा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | बुलढाणा | मेहकर | १ | विज्ञान |
| २ | पनवेल | रायगड | मुरूड जंजिरा | २ | विज्ञान |
| ३ | नागपूर | भंडारा | मोहाडी | ३ | विज्ञान |
| ४ | पनवेल | सिंधुदुर्ग | दोडामार्ग | ४ | विज्ञान |
| ५ | नागपूर | गडचिरोली | सिरोंचा | ५ | वाणिज्य |
| ६ | नागपूर | गडचिरोली | मूलचेरा | ६ | वाणिज्य |
| ७ | नागपूर | गडचिरोली | भामरागड | ७ | विज्ञान |
| ८ | नागपूर | गडचिरोली | कोरची | ८ | विज्ञान |
| | | | | ९ | वाणिज्य |
| ९ | नागपूर | चंद्रपूर | जिवती | १० | वाणिज्य |
| १० | सोलापूर | सोलापूर | दक्षिण सोलापूर | ११ | विज्ञान |
| ११ | नागपूर | नागपूर | पारशिवनी | १२ | विज्ञान |
| १२ | नागपूर | नागपूर | भिवापूर | १३ | विज्ञान |
| १३ | नागपूर | नागपूर | कुही | १४ | वाणिज्य |

**प्रपत्र-ब**

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हा | तालुका | विद्याशाखा संख्या | विद्याशाखा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल | रायगड | म्हसळा | १ | विज्ञान |
| २ | पनवेल | सिंधुदुर्ग | मालवण | २ | विज्ञान |
| ३ | नागपूर | गडचिरोली | भामरागड | ३ | वाणिज्य |
| ४ | नागपूर | गडचिरोली | एटापल्ली | ४ | वाणिज्य |

**अर्ज सादर करण्याची पध्दती व अंतिम मुदत -**

१. उपरोक्त नमूद ज्या तालुक्यात एकही वाणिज्य/विज्ञान विद्याशाखा अनुदानावर नाही, त्या तालुक्यात किमान एक विद्याशाखा अनुदान मंजूर करण्यासाठी मुंबई विद्यापीठ, मुंबई, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेकडे दि.२२/९/२०१५ पर्यंत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या विहित नमुन्यात अर्ज इच्छुक संस्थांनी करणे आवश्यक आहे. एका

विद्याशाखेच्या अर्जासाठी कुलसचिव यांचे नावे रू.१०,०००/- इतके शुल्काचा धनाकर्ष सादर करणे आवश्यक राहील.

२. अर्जासोबत महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा उदा.प्रयोगशाळा, कॉमनरुम, लायब्ररी तसेच महाविद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक व कर्मचारी यांची माहिती असलेली व्ही.डी.ओ. सी.डी. अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

३. ज्या तालुक्यांसाठी विद्याशाखा प्रसिध्द करण्यात आलेली आहे, त्यासाठी करावयाचा अर्जाचा विहित नमुना **"ज्या तालुक्यामध्ये वाणिज्य/विज्ञान विद्याशाखेचे एक ही महाविद्यालय/विद्याशाखा अनुदानित/विनाअनुदानित नाही, तथापि कायम विनाअनुदानित आहे अशा तालुक्यात संबंधित विद्याशाखा अनुदानावर आणणेसाठी करावयाचा नमुना"** या शिर्षकाखाली शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ www.dhepune.gov.in नि:शुल्क उपलब्ध आहे.

४. अनुदानासाठी इच्छुक संस्थांना नव्याने अर्ज करणे आवश्यक राहील. **दि.२२/९/२०१५** नंतर संबंधित विद्यापीठाकडे प्राप्त होणाऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांच्याकडे व शासनाकडे परस्पर अर्ज सादर करू नये, त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

५. तसेच शासनस्तरावरील अनुदान मंजुरीचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होणार असल्याने याप्रकरणी पाठपुरावा करण्याची आवश्यता नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१